# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

## जाहिर नोटीस

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचीतील प्रकरण ८ मधील नियम १०, १३(१), १४ व १५(१) अन्वये तसेच महाराष्ट्र (मोठया निवासी जागा असलेल्या) इमारतीवरील कर अधिनियम १९७९ कलम १० (१) अन्वये)

भिवंडी महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती क्षेत्रातील सर्व मालमत्ता धारकांस/भोगवटा धारकांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान प्रकरण ८ चे नियम १०, १३ (१), १४ व १५/(१) अन्वये तयार करण्यात आलेली आकारणी पुस्तके आणि महाराष्ट्र (मोठया निवासी जागा असलेल्या ) इमारतीवरील कर अधिनियम १९७९ चे कलम १० (१) अन्वये भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतीचे करयोग्य मुल्य व भिवंडी महापालिका हद्दीतील मोठया निवासी जागा असलेल्या इमारती आणि त्यांचे करयोग्य मुल्य दर्शविणारी सन २०१७-२०१८ या कालावधीची कर आकारणी पुस्तके (असेसमेंट रजिष्टर्स) तयार करण्यात आली असून ती संबंधित प्रभाग समिती कार्यालयात **दि. २४/०४/२०१७ ते दि. १५/०५/२०१७** पर्यंत कामाच्या दिवशी व वेळेत संबंधित धारक/अधिकृत व्यक्तीना पाहण्यासाठी उपलब्ध करण्यात आले आहेत.

या कर निर्धारण यादीत नमुद केलेल्या खालील बाबीवर हरकत असल्यास ती दि. **२४/०४/२०१७ ते दि. १५/०५/२०१७** पर्यंत लेखी स्वरुपात योग्य त्या पुराव्या दाखल कागदपत्रासह/ कारणांसह हरकत घेण्यासाठी सदर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

१. इमारतीचे व जमिनीचे करयोग्य मुल्य चुकीचे नोंदविले असल्यास.
२. घर क्रमांक अथवा मिळकत मालकाचे/धारकाचे नांव चुकीचे नोंदविले असल्यास.
३. इमारत अथवा जमिनीवर मालमत्ता कर देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नांवे चुकीचे नोंदविले असल्यास.
४. जमिनी अथवा इमारतीचे भाडेमुल्यात वाढ अथवा घट केली असल्यास.
५. इमारत अथवा तिचा काही भाग पाडून टाकला असल्यास किंवा इमारत अस्तित्वात नसल्यास.
६. मिळकतीच्या वापरात बदल केला असल्यास.
७. इमारतीच्या क्षेत्रफळास वाढ अथवा घट केली असल्यास.
८. कर आकारणी आदेशाची नोंद झाली नसल्यास.

उपरोक्त बाबीसंदर्भात हरकत /तक्रार असल्यास, लेखी कारणांसह व पुराव्यादाखल कागदकपत्रांसह मिळकत ज्या प्रभाग समिती कार्यक्षेत्रात आहेत त्या क्षेत्राकरिता असलेल्या प्रभाग समिती कार्यालयाच्या पत्यावर सहाय्यक आयुक्त (प्रभाग समिती) यांचे नांवे विहित मुदततीत अर्ज सादर करावेत.

सदरहू नोटीसीत नमुद केलेल्या मुदतीपूर्वी अथवा नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच प्रत्येक मिळकतीच्या हरकतीच्या हरकतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे. नोटीसीच्या कालवधीच्या मुदतीपूर्वी हरकत दाखल केली असल्यास, विचारार्थ घेतली जाणार नाही. त्यासाठी पुन्हा नोटीसीच्या मुदतीत हरकत दाखल करणे आवश्यक आहे.

दिनांक **२४/०४/२०१७ पूर्वी आणि दि. १५/०५/२०१७** नंतर आलेल्या तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान प्रकरणे ८ कलम १ ते ४ अन्वये इमारतीचा/मिळकतीचा मालमत्ता कर भरण्याची जबाबदारी हस्तांतरणाची नोंद करण्याकरिता संबंधीत सहाय्यक आयुक्त यांचेकडे विहित नमुन्यात स्वतंत्रपणे कधीही अर्ज करणे आवश्यक राहल त्याचा हरकत अर्जाच्या स्वरुपामध्ये त्याचा विचार केला जाणार नाही.

**टिप :-** हरकत अर्जात मिळकतीचा मालमत्ता ग्राहक क्रमांक, वसुली ब्लॉक क्रमांक, मिळतीचा संपूर्ण पत्ता व पत्रव्यवहाराचा पत्ता, ईमेल आयडी तसेच संपर्कासाठी मोबाईल नंबर नमुद करणे, तसेच सन २०१६-२०१७ ची संपूर्ण मागणी रक्कम अदा केल्याची पावती, पुराव्या सोबत जोडणे अनिवार्य राहिल.

**दि. / /२०१७**

**सही/-**
**उप-आयुक्त (कर)**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**